*पोंभुर्णा व सावली येथील अनुसुचित जमातीच्या मुलां-मुलींकरिता नवीन वसतीगृह सुरु करण्याची कार्यवाही प्राधान्याने पुर्ण करण्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे निर्देश...*
================================================================
=

चंद्रपूर जिल्हयातील पोंभुर्णा आणि सावली येथे अनुसुचित जमातीच्या मुलां-मुलींकरिता नवीन वसतीगृह सुरु करण्याची कार्यवाही प्राधान्याने पुर्ण करण्याचे निर्देश अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. पोंभुर्णा आणि सावली येथे वसतीगृहांसाठी भाडेतत्वावर इमारती घेण्यात आल्या असून आवश्यक फर्निचर व साहित्य त्या ठिकाणी पोहचते करुन त्वरीत वसतीगृहे सुरु करण्यात येतील असे आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक उईके यांनी सांगितले.
दि. 9 जुलै रोजी पोंभुर्णा आणि सावली येथे अनुसुचित जमातीच्या मुलां-मुलींकरिता नविन वसतीगृहे सुरु करण्याबाबत बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार, आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक उईके, आदिवासी विकास आयुक्त श्री. नितीन पाटील, आदिवासी विकास विभागाचे उप सचिव श्री. सुब्बराव शिंदे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग व आदिवासी विकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते.
पोंभुर्णा आणि सावली येथे अनुसुचित जमातीच्या मुलां-मुलींकरिता नविन शासकीय वसतीगृहे सुरु करण्यास दि. 8 मार्च, 2019 च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. नविन 4 वसतीगृहांकरिता आवश्यक 20 नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर वसतीगृहांसाठी शासकीय इमारत सद्यस्थितीत उपलब्ध नसल्यामुळे भाडेतत्वावर इमारती घेण्यात आल्या आहेत. या इमारतीमध्ये फर्निचर व आवश्यक साहित्य पोहचते करण्यात आले असून आदिवासी विद्यार्थ्यांनी सावली व पोंभुर्णा येथे प्रवेश घेण्यासंबंधी वर्तमानपत्रात दि. 4 जुलै, 2019 रोजी आवाहन करण्यात आले आहे, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.
वसतीगृहांकरिता नविन इमारतींचे बांधकाम करण्यास्तव तहसिल कार्यालय, पोंभुर्णा यांनी चेकहत्तीबोडी येथील जागा उपलब्ध असल्याचे कळविले आहे. या जागेची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर जागा निश्चितीची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल. सावली येथे शहराजवळ जागा शोधण्याचा प्रयत्न सुरु असून जागा न मिळाल्यास खाजगी जागा विकत घेण्याचे प्रस्तावित असल्याची माहिती विभागातर्फे देण्यात आली.